# Meetings With Govt. & NGO`S

## इंडो स्पॅनिश चेंबर ऑफ कॉमर्स आणि मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ सातारा यांच्यात सामंजस्य करार

Pune  April 02,2025

२ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथे इंडो स्पॅनिश चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीदरम्यान इंडो स्पॅनिश चेंबर ऑफ कॉमर्स आणि मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ सातारा (MAS) यांच्यात परस्पर सहकार्याचा सामंजस्य करार करण्यात आला. या MoU मुळे MAS सदस्यांच्या उत्पादनांच्या स्पेनमध्ये निर्यातवाढीस चालना मिळणार आहे, तसेच स्पॅनिश उद्योगांशी सहकार्य, संयुक्त संशोधन व विकास आणि आयात पर्याय निर्मितीसाठी संधी निर्माण होणार आहे. याशिवाय, स्पॅनिश कंपन्यांना सातारा जिल्ह्यातील पुरवठादार विकास, मेक इन इंडिया उपक्रम आणि स्थानिक संस्थांमार्फत विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी संधी मिळणार आहेत.
हा सामंजस्य करार करण्यासाठी ISCC चे अध्यक्ष श्री. ऑस्कर एस्टेबन यांनी MAS प्रतिनिधी यांना आमंत्रित केले होते. MAS तर्फे संचालक श्री. धैर्यशील भोसले यांनी ह्या करारावर स्वाक्षरी केली.
या वेळी स्पेनचे आर्थिक व वाणिज्य सल्लागार श्री. व्हिन्सेंट गोमिस, ISCC चे संचालक व BBVA चे आशिया प्रतिनिधी श्री. जोएल अकीलन व MAS चे संयुक्त सचिव श्री. राहुल शिंदे उपस्थित होते.

स्पॅनिश कंपन्यांचे प्रतिनिधी, वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी आणि स्पॅनिश आर्थिक व वाणिज्य दूतावासाचे सदस्यही या बैठकीस उपस्थित होते आणि त्यांनी MAS सोबत सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.



